# ८ - प. पू. श्रीगुरुजींचा पोवाडा

देवाची कृपा जाहली | शुभ घडी आली | पूर्वेला लाली | पसरली, दिनमणि उगवला || माघाच्या वद्य एकादशीला | आज हा (ऐका राव) मंगल दिन आला ||

तोऱ्यांत राहुनी खडा | आरवे कोंबडा | आवाज त्याचा खडा | सनई चौघडा वाजे दणक्यांत || नागपुरीं भोसल्यांच्या राज्यांत | उजळवी पूर्व स्मृती चित्तांत ||

(चाल) सोमवारच्या शुभ दिवसाला | पुत्ररत्न आलं जन्माला ||
आनंद झाला मातेला | जाहला हर्ष पित्याला ||

(चाल) काय वर्णूं अंगकांतीला | मागं टाकलं सूर्यबिंबाला |
जणूं तेजाचाच पुतळा | अवतरला काय धरणीला |
देण्यास स्फूर्ति, चेतना हिन्दुराष्ट्राला ||
करायास धर्मउद्धार कृष्ण अवतरला ||
लक्ष्मीबाई माता आणि पिता सदाशिवराव ||
प्रेमानं ठेवती पुत्राचं नांव माधव ||

(चाल-चंद्रकांत) दिसांमासांनीं वाढूं लागला माधव बालपणीं |
एकएक तो गुण तयाचा येई उजळोनी ||
झेप बुद्धिची असामान्य, ती अस्खलित वाणी |
एकपाठीपणा, करारीपणा, गुण भरे नयनीं ||
~~दिसादिसांनीं माधवगुणही प्रकाशती फार~~ |
सुलक्षणांनी तेज रवीचें फांके चौफेर |
दिसादिसांनीं माधवगुणही प्रकाशती फार ||

(चाल) शाळेची अंतरीं आवड | शिक्षणाची ओढ | तयाला जोड | छंद

गोट्यांच्या खेळाचा त्रास ॥ प्राथमिक, चौथी जाहला पास। सहज लीलेनें पहिल्या क्रमांकास ॥



(चाल) १९२२ सालीं । परीक्षा दिली । मॅट्रिक झाले ॥
शिक्षण उच्च घेण्याला । हिस्लॉप कॉलेजात । नांव घातलें ॥
प्राणिशास्त्र विषय निवडून । मोठ्या आवडीनें । ज्ञान घेतलें ॥
ज्ञानांत मिळे आनंद । त्यांनी अमर्याद । वाचन केलें ॥

(चाल) धर्मशास्त्र आणि इतिहास । इंग्रजींचा केला अभ्यास ॥
विज्ञान आणि वेदान्त । शास्त्रांच्या यांचा हव्यास ॥
महाकाव्यें, संतवाङ्मय । वाचण्याची पुरविली हौस ॥
जो जो विषय त्यांनी वाचावा । आत्मसात करून घ्यावा ॥
मिळविले ज्ञानाच्या ठेवा । कुणालाही वाटावा हेवा ॥

(चाल) डोक्यावर्ती पुस्तकं चार-दोन । वहावा अभिमान । उंचावून मान । टेंभा मिरवावा आपला लोकांत ॥ टिमकी वाजवावी आपली जगातांत ।
असा विचार कधीं न केला चित्तांत ॥

(चाल) विज्ञान विषय घेऊनी झाले इंटर ॥
इंग्रजी विषयामध्यें पहिला नंबर ॥
त्यापुढें त्यांनी गाठलें बनारस शहर ॥

(चाल) १९२६ सालीं । मिळविली पदवी बी. एस्सी ॥
त्यापुढें दोनच वर्षांनी । उत्तीर्ण झाले एम्. एस्सी ॥
प्राणिशास्त्र विषय घेऊन । प्रवीणता मिळविली खाशी ॥
पुढे संशोधन करण्याला । प्रस्थान केलें मद्रासीं ॥
एक वर्ष काम करून । परतुनी आले बनारसीं ॥
(पुनरपि आले बनारसीं ॥)

(चाल-चंद्रकांत) काशीमध्यें प्राध्यापक ते झाले कॉलेजांत।
'गुरुजी' नामें प्रसिद्ध होती गुरुजी छात्रांत॥
सार्थकता शब्दाची दाखवी गुरुजी हें नाम।
सकल गुणांचें विद्येचेंही गुरुजी हे धाम॥

(चाल) बनारसाला आला संपर्क संघकार्याशीं॥
(पुढें) व्यवसाय सोडुनी आले नागपुरासी॥
जाहली भेट डॉक्टर हेडगेवारांशीं॥

(चाल) १९३४ सालाला। आले मुंबईला। प्रचार कार्याला। धूमधडाक्यानं
प्रचार केला। संघाचा प्रसार वाढविला। परतले परत नागपुराला॥
(चाल) वकीलीची परीक्षा दिली। १९३५ सालीं। (पण) फार दिवस
वकीली नाहीं केली। (कारण) मोक्षाची आस अंतरीं फार लागली॥

(चाल) सारगाछी आश्रम गांठिला। बिहार प्रांताला। प्रवेश मिळविला। मोक्षसाधनेला।
अखंडानंद स्वामी गुरु केले॥सेवाभावानें तोषविले। अनुग्रह घेऊनी
धन्य झाले॥
स्वामीजींनीं देह ठेविला। '३७ सालाला। मार्च अखेरीला। गुरुजी
फार दुःखी झाले॥ नागपुर प्रांतीं परत फिरले। संघकार्यांत
रमुन गेले॥

(चाल) १९४० सालाला। जून मासीं २१ तारखेला। डॉक्टर गेले स्वर्गाला।
जणुं संघ पोरका झाला। अशा आणीबाणीच्या वक्ताला।
कार्याची धुरा वाहण्याला। गुरुजींनीं चंग बांधला।
झाले सरसंघचालक त्याच समयाला॥
तेव्हांपासून अखंडित दौरा देशाच्या कोना॥
खडान् खडा देशाची पूर्ण माहिती घेण्याला॥
मार्गदर्शन करुन कार्याचा व्याप वाढविला॥

भगीरथ यत्नें कार्याचा इमला उभा केला ॥ 

(चाल) विस्तार संघाचा झाला | प्रत्येक प्रांता प्रांताला | प्रत्येक जिल्ह्या जिल्ह्याला | आणि तालुक्यांच्या शहरांना | लहान-मोठ्या खेडेगांवाला |

संघाचें जाळें पसरलें अख्या देशाला ॥
गुरुजींच्या तपाचें हें श्रेय सांगतो तुम्हांला ॥

पण नियतीनं दावा साधला | गांधींचा वध जाहला | संघावर हल्ला जाहला | बेकायदा संघ ठरविला | सरकारनं हुकुम काढला | दावुनी दूरदर्शीला | गुरुजींनी संघ बंद केला |

संघर्ष टाळण्यासाठीं संघ बंद केला ॥

(चाल) बंदी उठविण्यास वाटाघाटी | केल्या आटापिटी | व्यर्थ पायपिटी | ठरली परी बधेना सरकार ॥ ठाम परी गुरुजींचा निर्धार | निडर माणसाला नसे दरकार ॥

सुरू झालें सत्याग्रहपर्व | अभूतपूर्व | कार्याचा गौरव (गर्व) भिनली मनीं सर्व | स्वयंसेवक झाले सिद्ध त्यागास ॥ लक्षावधि लोक गेले तुरुंगास | नेत्याच्या वंद्य मानुनी वचनास ॥

भट्टीतुनी तावुनी सोनें | अधिक प्रमाणानें | तळपे तेजानें | रिपूंनी टाकी डोळ्यांला ॥ हाच दाखला प्रसंगाला | संघ-सत्याग्रह पर्वाला ॥

पुन्हां शाखा सुरू जाहल्या | वाढूं लागल्या | रेंगुं लागल्या | अभयदान हिंदु समाजाला ॥ ~~हाच दाखला प्रसंगाला | संघ सत्याग्रह~~ समाज संघटित करण्याला | भरपोस यश आलें कार्याला ॥

गुरुजींची पुण्याई भारी | संघाला लाभली | म्हणुनी या काळीं | दिसतो संघाचा व्याप मोठा ॥ वाढला संघवृक्ष मोठा | वांकड्या नजरेनं तिकडें बघतां | जळुनी जाई दुश्मनांचा ताठा ॥

लागलें वर्ष एकावन्न | म्हणुन वर्षा दिन | वाढदिवस छानं | वर्धापन (दिनं) साजरा होई आज देशास ॥ गुरुजींना दीर्घायुष्य

देव्यास | वसंतराय (शाहीर) विनवी प्रभू-चरणास ॥ ४६

---

मुम्बई,
सन १९५६

(वरील पोवाडा गोरेगांवकर चाळींत सत्यनारायण पूजा वाढदिवसानिमित्त आयोजित केली असतां तेथें गायिला.)